पारावरच्या गप्पा

# यंदा ऊसाला किती भाव?

■ या प्रश्नाचं उत्तर द्यायला
देवा तूच धाव असं
म्हणण्याची येते वेळ...

■ ऊस ठरेल सर्वांसाठीच
गोड असा घातला
पाहिजे मेळ...



देवदर्शन आटोपून गणपत संपतची वाट पाहत पारावर बसला होता. सकाळी सकाळी ऊसतोड करणाऱ्या मजुरांच्या गाड्यांचा ताफा बघताना गणपत त्यांच्याकडे पाहत विचार करत होता. संपत त्याच्याजवळ येऊन बसला तरीही गणपतचे लक्ष नव्हते. तेव्हा त्याचा खांदा हलवून संपत म्हणाला, ''का रं गंपा, एवढा काय विचार करतोय? काय ऊसतोड सुरू करण्याचा विचार आहे की काय? पाहिजे तर मी तुला एक बैलगाडी घेऊन देतो.''

खरं तर संपतने गंमतीने त्याला विचारले परंतु गंभीर चेहऱ्याने गणपत म्हणाला, ''चालेल मला. आज शेतकऱ्यापेक्षा शेतकऱ्याच्या शेतावर काम करणारेच मोठे होत आहेत. दरवर्षी मजुरांची मजुरी वाढते, ज्यांच्याकडून शेतकरी खते- औषधे घेतो त्या दुकानदाराचे कमिशन वाढते. परंतु आपल्या शेतीमालाचे भाव वाढण्याऐवजी कमीच होतात. एकीकडे उत्पादन खर्च वाढतो तर दुसरीकडे शेती उत्पादनाचे दर कमी होतात. आता हेच बघ ना, यावर्षी ऊसाचे दर मागच्या वर्षीपेक्षा कमी देणार, असे साखर कारखाने सांगतात. म्हणजे ऊसाचा उत्पादन खर्च यावर्षी कमीत कमी १०-१५ टक्के वाढला. पावसामुळे उत्पादनामध्ये मोठी घट होत आहे. या बदल्यात ऊसाला भाव वाढवून देण्याऐवजी भाव कमी देणार, असे सांगतात. मात्र ऊसाची तोडी करणारे तसेच ऊस वाहतूक करणाऱ्यांना मात्र १४-१५ टक्के वाढ दिली. म्हणजे आपण ऊस पिकवितो, त्यावर ऊसतोडीवाले उदरनिर्वाह करतात, त्यांचे पगार वाढले. ऊस वाहतूक करणाऱ्याला दर वाढवून दिला. ऊसापासून साखर तयार करणाऱ्या कारखान्यातील कामगारांचेही पगार वाढले. कारखान्याच्या संचालकांच्या मीटिंग भत्त्यात वाढ झाली; मात्र ज्यांच्या जिवावर हे सर्व चालू आहे त्यांना मात्र ठेंगा! म्हणून संपा, मला तर वाटायला लागलंय, शेती द्यावी सोडून आणि जावे कोठेतरी काम करायला. तू बैलगाडी घेऊन देत असशील तर जातो ऊस तोडायला.''

आपल्या दोन शब्दांमुळे गणपतच्या जखमेवर मीठ चोळले जाईल किंवा त्यावर एवढे महाभारत ऐकायला मिळेल असे संपतला वाटले नव्हते. आता हा गुंता संपतला सोडवायचा होता. कारण सकाळी सकाळी गणपतचा मूड चांगला केला तरच दोघेही स्वत:च्या शेतावर जाऊन चांगले काम करू शकणार होते. त्यामुळे संपत गणपतच्या जास्त जवळ जाऊन त्याच्या पाठीवर हात ठेवून म्हणाला, ''हे बघ गंपा, मला तुझी काही चेष्टा-मस्करी करायची नव्हती. तू ऊसतोडीवाल्यांकडे टक लावून पाहत होता म्हणून सहज म्हटलं घेऊन देतो

बैलगाडी आणि तू जे म्हटलं आहे तेही बरोबर आहे. परंतु सकाळी सकाळी ही शेती व्यवसाय सोडण्याची भाषा करू नको बरं. तू जर शेती सोडली तर मला दुसरा शेतकरी मित्र कसा मिळणार शेती विषयावर बोलायला? तू शेतीमधल्या अनेक अडचणी विचारतो म्हणून मला फार अभ्यास करून ठेवावा लागतो. कारण तुझे प्रश्नच एवढे असतात की त्याला उत्तर देता देता माझा फार दम तुटतो! तुझ्या या अनेक प्रश्नांमुळेच माझा शेतीचा अभ्यास वाढला बघ. मी शेती विषयातील अभ्यासू व्यक्ती झालो तो तुझ्यामुळेच. त्यामुळे तू शेती सोडण्याची भाषा सोडून दे.''

यावर मात्र गणपत मोठ्याने हसला आणि संपाला टाळी देऊन म्हणाला, ''मी आहेच हुश्शार. संपतचा हुश्शार शेतकरी मित्र. बरं ते जाऊ दे, संपा मला एक प्रश्न काही समजला नाही- दरवर्षी ऊसाचा भाव वाढतो. ती काय 'एफआरपी' की काय म्हणतात ती वाढते, मग यावर्षी ऊसाचा दर कमी का? मागील तीन-चार वर्षांपासून ऊसाचे भाव काही वाढेनात. त्यामुळे ऊस शेतीचे मला तर काही खरं वाटत नाही. त्यापेक्षा इतर पिकांकडे वळावं असे म्हणतो.''

यावर संपत म्हणाला, ''हे बघ संपा. आपल्या शेती व्यवसायामध्ये कोणत्याच पिकाच्या उत्पादनाची आणि भावाची हमी देता येत नाही बघ. मान्सून आणि मार्केट या दोन 'मा'च्या म्हणजेच 'मामा'च्या ताब्यात आपली शेती आणि आपण आहोत. त्यामुळे हे पीक नको, ते पीक घेऊ असे करून कसे चालेल? आपण आपल्या व्यवसायामध्ये तसेच पीक पद्धतीमध्ये सातत्य ठेवले पाहिजे. कधी कशाचे भाव वाढतील आणि कधी कशाचे भाव कोसळतील हे सांगता येत नाही. ते आपल्या हाती नाही. आता तर आपले गावच नाही तर सर्व जग हेच एक गाव झाले आहे. म्हणजे कोठे काय, कधी, किती पिकेल हे सांगता येत नाही. त्याचा परिणाम त्या वस्तूच्या भावावर होतो. म्हणून ऊस पीक नको, इतर पीक करतो असे करून आणखीनच खड्ड्यात जाण्यापेक्षा आपल्या शेतावर पिकाची विभिन्नता ठेवावी. दुसरे असे की आपण नवनवीन तंत्रज्ञानांचा वापर करून शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे आणि शेती उत्पादन खर्चात बचत करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. हे सर्व केले तरच आपला शेती व्यवसाय किफायतशीर होईल.''

संपतच्या या बोलण्यावर गणपत हसत होता परंतु त्याच्या मनाची चलबिचल चालूच होती. तो म्हणाला, ''हे बघ संपा, तू म्हणतो ते मला पटते. पण हे कारखानदार, सरकारचा कृषी विभाग यासाठी काही प्रयत्न का करत नाहीत? उदाहरण द्यायचे झाले तर आपण जसं शेती परवडत नसेल तर विविध प्रयोग करतो, शेतीमध्ये विविध व्यवसाय सुरू करतो किंवा त्याच्यामध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून शेती व्यवसाय फायद्याचा करण्यासाठी आपले सतत प्रयत्न सुरू असतात. मग साखर कारखाने यासारखे प्रयोग का करत नाहीत? आता हेच बघ ना- लोक आता साखर खाण्याचे प्रमाण कमी करत आहेत. गुळाचा चहा, कमी साखरेचा चहा, कमी गोड खाणे यासारख्या सवयी समाजामध्ये वाढत आहेत. म्हणजेच साखरेचा खप कमी होत चालला आहे. दुसरीकडे ऊसापासून साखरेशिवाय इथेनॉल, अल्कोहोल, वीज व इतर पदार्थांची निर्मिती करता येते. या सर्व पदार्थांचा खप वाढत आहे. त्यांची मागणी देशामध्ये तसेच परदेशात वाढत आहे. परंतु आपण मात्र ऊसापासून साखर तयार करण्याचे काम मागील १०० वर्षांपासून करत आहोत आणि त्याच्यात वाढ होत आहे. साखर तयार करायची आणि ती विकली जात नाही म्हणून कमी किंमतीमध्ये विकायची. मग कमी पैसे झाले म्हणून शेतकऱ्यांच्या ऊसाला कमी भाव द्यायचा हे दुष्टचक्र का थांबत नाही? सरकार, कारखानदार यासाठी मोठ्या प्रमाणात का प्रयत्न करत नाहीत?''

यावर संपत हसून म्हणाला, ''आरं गंपा, तुझा तर लई आभ्यास झालाय साखर कारखानदारीच्या व्यवसायाचा. तू म्हणतो ते खरं आहे पण काही प्रमाणात शासनाच्या वतीने साखर कारखानदारीला पुढे घेऊन जाण्यासाठी अनेक प्रयत्न झाले. परंतु सरकारचं धोरण धरसोडीचं असतं. आता तूच म्हणाला ना, की ऊसापासून साखरेबरोबर इतरही पदार्थ तयार होतात. उदा. इथेनॉल तयार केल्यानंतर त्याची विक्री किंमत तसेच किती प्रमाणात तयार केले पाहिजे याचे धोरण कमीत कमी ५-१० वर्षांचे पाहिजे. आपली गंमत कशी आहे गंपा, लागली तहान की खोद विहीर! पेट्रोलचे भाव वाढले की शासन म्हणतं इथेनॉल तयार करा. परंतु त्यासाठी सर्व प्रक्रिया, यंत्रणा, तंत्रज्ञान याचा अवलंब करता करता एक-दोन वर्षे जातात. पेट्रोलचे भाव कमी

झाले किंवा साखरेचे भाव वाढले की परत काय धोरण घ्यावं याचा मेळ शासनाला घालता येत नाही. बरं सरकार आजकाल जास्त विचार ग्राहकांचा करतंय. झाली साखर १०० रु. किलो तर काय बिघडणार आहे! द्या की त्यांना स्वस्त धान्य दुकानातून! पेट्रोल नाही का ८०-९० रुपये लिटरने विकतो, तोही ग्राहकच आहे ना? परंतु याचा विचार गांभीर्याने होत नाही. कांदा महाग झाला- आता त्यावर अनेक बंधनं. साखर महाग झाली- साखरेचे उत्पादन वाढवा, ऊस लागवड वाढवा. भाव उतरले की ऊस कमी लावा! हे काय सर्व एका दिवसात बदलत नाही. बरं साखर कारखाने आणि त्याला चालविणारे संस्थाचालक यांचं नेमकं काय करायचं याचं धोरणही नक्की नसतं. जास्त ऊसाचं गाळप करायचं एवढाच उद्देश. ऊसाचे गाळप जास्त, जास्त साखर मात्र साखर विकली जात नाही, शेतकऱ्यांना वेळेवर पैसे मिळत नाहीत, कर्ज वाढत जाते कारखान्यांचे. आणि नंतर हेच कारखाने बंद पडून ज्या शेतकऱ्यांच्या जिवावर हे कारखाने उभे राहिले त्यांचे नुकसान होते. या सर्व दुष्टचक्रातून साखर कारखानदारी बाहेर पडायची असेल तर ऊसापासून विविध पदार्थांचे उत्पादन करण्याची यंत्रणा कारखान्याकडे उभी राहणे महत्त्वाचे आहे. ऊसापासून थेट इथेनॉल तयार करणे, इथेनॉलच्या पुढे गॅसोलिन म्हणजेच गॅसवर चालणाऱ्या गाड्यांना लागणारा गॅस तयार करण्याची यंत्रणाही कारखान्याकडे असणे गरजेचे आहे. वीजनिर्मिती प्रकल्प, मद्यनिर्मिती किंवा अल्कोहोल निर्मिती यासारख्या सर्व सुविधा कारखान्याकडे तयार पाहिजेत. म्हणजे ज्यावेळी ज्या वस्तूला चांगली मागणी असेल त्याचेच उत्पादन कारखान्यांनी करावे. आपल्याला आपलं सरकार सांगतंय की, जे विकेल तेच पिकवा. मग या कारखान्यांना कोणी का सांगत नाही की आता तुम्ही साखर जास्त बनवू नका. इथेनॉल तसेच वीज बनवा. बरं शेतकऱ्याकडे ऊस तुटून गेल्यानंतर लाखो टन ऊसाचे पाचट पडून असते. ते अनेक शेतकरी पेटवूनच देतात. या पाचटापासून बायोइंधन तयार करण्यासाठी तो का पुढे येत नाही? हे बघ संपा, आपण आपल्या शेतीमध्ये विविध व्यवसाय आणि पिकांची जोड लावतो; ही जोड असेल तरच आपला शेती व्यवसाय किफायतशीर होतो. त्या धर्तीवरच जो व्यावसायिक आपल्या व्यवसायामध्ये काळानुसार बदल करत नाही त्याचा व्यवसाय बुडतो. मर्फीचा रेडिओ, टायटनचे घड्याळ, फियाटची कार यासारखी अनेक उदाहरणे आहेत की त्यांनी त्यांच्या व्यवसायामध्ये बदल केला नाही आणि त्यांचा व्यवसाय संपला. साखर कारखानदारांनीही आता वेळीच बदल केला नाही तर त्यांनाही या चक्रव्यूहातून बाहेर पडणे अवघड जाईल. खरं तर ऊसासारखा एक महत्त्वाचा खजिना. ज्यापासून साखर, दारू, इंधन, ऊर्जा याबरोबरच अनेक पदार्थ तयार होतात ते तयार करूनही तोट्याच्या मार्गाने जात असल्यामुळे आज आपण ऊस उत्पादक शेतकरी कुबेर होण्याऐवजी दरिद्रीच राहिलो आहोत.''

संपतच्या एवढ्या बोलण्यावर गणपतच्या मनातली मळमळ कमी झाली. तो म्हणाला, ''पण संपा, मला एक सांग, हे चित्र कधी बदलणार की अभिमन्यूसारखे चक्रव्यूहामध्ये अडकून आपल्यालाही संपविणार?''

यावर संपत हसून म्हणाला, ''गंपा, हे बघ. आता जग झपाट्याने बदलतंय. जे यामध्ये बदल करतील ते पुढे जातील. नाही तर त्यांचा अंत जवळ आलाच म्हणून समज. सहकारी कारखानदारी जेथे चांगली चालली आहे ते पुढे जातील नाही तर त्यांच्या मानगुटीवर बसणारी खासगी कारखानदारी पुढे येत आहे. सहकारी आणि खासगी कारखानदारी यामध्ये स्पर्धा सुरू झाली तर निश्चितच त्यातून काहीतरी हिताचे पुढे येऊ शकते. खासगी कारखानदार त्यांच्या स्वत:च्या फायद्यासाठी कोणतेही मोठे निर्णय झटपट घेऊ शकतात. यातून नवीन तंत्रज्ञान, संकल्पना आणि उत्पादने पुढे येतील. पण गंपा, तुला एक सांगतो, ऊस पीक हे निश्चितच शेतकरी, कारखानदार तसेच शासनाला एक आधारस्तंभ आहे. याचा नीटनेटकेपणाने विचार करून; तसंच अल्प कालावधीबोबरच दीर्घकालीन योग्य ते धोरण सर्वांनी तयार केले तर ऊस शेती सर्वांनाच उपकारक होणार आहे.''

यावर मोठा श्वास घेऊन गणपत म्हणाला, ''संपा, बरं झालं मी चर्चा सुरू केली. मीही अल्पकालीन विचार करून ऊस शेती सोडण्याचा विचार करत होतो. परंतु दीर्घकालीन विचार केला तर माझी शेती शाश्वत होण्यासाठी मला ऊसाचा आधार घ्यावाच लागेल. चल थंडी वाजतेय. मस्तपैकी स्पेशल चहा घेऊ या!!'' ■